# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### मुंबई-ठाणे शहराला पाणीपुरवठा करणा-या तानसा जलाशयाच्या संरक्षित जलस्त्रोत सुधारण्याच्या कामांकडे मुंबई महानगरपालिकेने दुर्लक्ष केले असल्याबाबत

**(१) १८४ (२३-१२-२०१४). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-ठाणे शहराला पाणीपुरवठा करणा-या तानसा जलाशयाच्या संरक्षित जलस्त्रोत सुधारण्याच्या कामांकडे मुंबई महानगरपालिकेने दुर्लक्ष केले असल्याचे माहे जुलै, २०१४ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तलावाचे जलस्त्रोत व नैसर्गिक पाणवळ, पाणवठे, पाणीस्त्रोत या जागी छोटे बंधारे दगडी सिमेंट बांध धूपप्रतिबंधक चार आदि कृत्रिमरित्या सुधारित कामे करण्याच्या दृष्टीने वन्यजीव विभागाने मुंबई मनपाने पाच वर्षाचा आराखडा प्रस्तावित केला होता व त्यानुसार सन २०११-१२ या वर्षात निधी देण्यात आला परंतू त्यानंतर महानगरपालिकेने विभागाचा खर्च प्रमाणपत्र व इतर प्रक्रियात्मक पूर्ण न केलेली बाब समोर ठेवून निधी खर्च दिला नसल्याने तानसा जलाशयाच्या संरक्षित जलस्त्रोत सुधारण्याबाबत व्यत्यय आला आहे हे लक्षात घेता शासन त्वरीत आवश्यक ती कार्यवाही करणार वा करीत आहे काय,

(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०६-२०१५) :**(१) हे खरे नाही.

(२) महाराष्ट्र शासनाच्या राज्य सरोवर योजनेंतर्गत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या तानसा व मोडकसागर धरणाच्या पाणलोट क्षेत्राचा विकास करण्याकरिता सन २००८-०९ ते सन २०१२-१३ या ५ वर्षांच्या कालावधीमध्ये वन विभागास विकास कामे करण्याकरिता लागणारा आवश्यक तो वर्षनिहाय एकूण रु.५,२१,०१,८००/- इतका अग्रीम निधी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत उपलब्ध करुन देण्यात येणार होता. वन विभागाने केलेल्या मागणीनुसार आतापर्यंत बृहन्मुंबई महानगरपालिकेने रु.८०,००,०००/- एवढा निधी वनविभागास उपलब्ध करुन दिला आहे. त्यापैकी

दिनांक ३१.०३.२०१३ पर्यंत वन विभागाने एकूण रु.७९,७३,५९९/- एवढ्या रक्कमेची विकास कामे केली. सदर कामे व कामाची प्रगती वाढविण्याबाबत महानगरपालिकेने वेळोवेळी वन विभागास कळविले आहे. परंतु उर्वरित विकास कामे करण्यासाठी अग्रीम निधीची कोणतीही मागणी विहीत मुदतीत न आल्यामुळे महानगरपालिकेने निधी उपलब्ध करुन दिला नाही. तथापि, वन विभागाने उर्वरित व वाढीव निधीची मागणी केल्यामुळे त्यास स्थायी समितीची मान्यता मिळाल्यानंतर उर्वरित अग्रीम निधी वन खात्यास प्रदान करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हडपसर मतदार संघातील पुणे मिरज रेल्वे लाईनवर सासणे नगर (हाडेवाडी) येथे अडंर ब्रीज बाधणेबाबत**

**(२) ११६७ (२३-१२-२०१४). श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हडपसर मतदार संघातील पुणे मिरज रेल्वे लाईनवर सासणे नगर (हाडेवाडी) येथे अडंर ब्रीज बांधणेबाबतची नागरिकांकडून होत असलेली मागणी अनेक वर्षापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या ठिकाणी अडर ब्रीज व्हावा म्हणून नागरिकांनी अनेक वेळा आंदोलने केली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पुणे महानगरपालिकेने या अंडर ब्रीजसाठी प्रस्ताव तयार करुन हि अजून पर्यंत हे काम प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने यावर काय उपाय योजना केली आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०८-२०१५) :**(१), (२) व (३) होय.
(४) पुणे महानगरपालिकेतर्फे सदर कामासाठी मे.टी. ॲन्ड टी ग्रुप, पुणे यांना दिनांक १७.०६.२०१३ रोजी वर्कऑर्डर देणेत आली असून रेल्वे अंडरपास करीता रेल्वे विभागाच्या मागणीनुसार रु.१,५४,१९,५९५/- विविध शुल्कापोटी रेल्वे विभागास अदा केलेले आहेत. प्रस्तुत प्रकल्पाअंतर्गत पावसाळी लाईनेचे काम ठेकेदारामार्फत सुरु करणेत आले आहे.

सदर जागेच्या भूसंपादनाची कार्यवाही विशेष भूसंपादन अधिकारी क्र. १६ यांचे मार्फत भूसंपादन क्र. एलए-५८५ नुसार सुरु आहे. भूसंपादन अधिकाऱ्यांनी मागणी केल्यानुसार नुकसान भरपाईची संपूर्ण रक्कम रु. (२४,५३,०६,६००/-) महानगरपालिकेकडून जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे भूसंपादन प्रक्रियोसाठी जमा करणेत आलेली आहे. भूसंपादनाची प्रक्रिया कलम ६ ची अधिसूचना प्रसिध्द होणेवर प्रलंबित आहे.
(५) पुणे महागनरपलिकेचे विविध प्रकल्प राबविताना भूसंपादन प्रक्रिया त्याचवेळी समांतरपणे चालू ठेवण्यात येते. प्रत्यक्षात प्रकल्पाची सुरुवात झाल्यानंतर जागा मालकाकडून तत्कालीन परिस्थितीनुसार जागा ताब्यात देणेबाबत सकारात्मक दृष्टीकोन दाखविला जातो.

सदर प्रकरणी देखील प्रस्तुत रेल्वे अंडरपासचे काम सुरु करणेपूर्वी परिसरातील पर्यायी रस्त्यांचे विकसन करणे व या रस्त्याच्या कामासाठी २४ मी. (डी.पी.) रस्ता रुंदीपर्यंत जागा ताब्यात घेणे अत्यावश्यक आहे. वाहतुकीसाठी पर्यायी रस्ते तसेच या कामाचे पोहोच रस्त्यामधील अतिक्रमण काढलेनंतर अंडरपासचे काम हाती घेणे शक्य होणार आहे.

---

**वांद्रे पश्चिम येथील स्वामी विवेकानंद सरोवराच्या सुशोभीकरणाबाबत**

**(३) १२१० (२३-१२-२०१४). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वांद्रे पश्चिम येथील स्वामी विवेकानंद सरोवराच्या सुशोभीकरणाचा निर्णय २००९ मध्ये घेण्यात आला असून ३३ कोटी रुपये खर्च करुन सुशोभिकरण करण्याचे ठरविले असताना या वर्षी फक्त ५ कोटी रुपयांची तरतूद केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या तलावाचे सुशोभिकरणाचे काम ५ वर्षापेक्षा अधिक काळ प्रलंबित राहील्याची कारणे काय आहेत,

(३) तसेच, हे काम नियोजित वेळेत पूर्ण करण्यासाठी शासनाने काय उपाययोजना केली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०८-२०१५) :**(१) वांद्रे पश्चिम येथील स्वामी विवेकानंद तलावाच्या सुशोभिकरणाचा आराखडा बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वास्तुरचना विभागातर्फे सन २००९ साली तयार करण्यात आला होता व सदर आराखड्यानुसार कामाचे अंदाजपत्रक रु. ३३ कोटी इतके होते. तथापि, त्यावेळी अर्थसंकल्पात पुदेशी तरतुद नसल्याकारणाने सुशोभिकरणाचे काम हाती घेण्यात आले नव्हते. यावर्षी ५ कोटी रुपयांची तरतूद केली आहे, हे खरे आहे.

(२) निधी उपलब्धतेअभावी सदर काम हाती घेण्यात आले नाही.

(३) व (४) सन २०१३ मध्ये मुंबई महानगरपालिकेत उद्यान कक्षाची स्थापना झाल्यावर प्राधान्याने सदर तलावाच्या सुशोभिकरणासाठी निविदा मागविण्यात आली व सदर कामे हे कंत्राटदार मे. वाल्सन यांच्या माध्यमातून सुरु करण्यात आले आहे. या कामाचा कालावधी १८ महिने असून, सदर काम हे २५ ऑगस्ट, २०१५ पर्यंत चालू राहील. तलाव नुतनीकरणाचे आराखडे तयार असून, सदर तलाव हा पुरातन वास्तू अंतर्गत मोडत असल्याने, सदर तलावाच्या नुतनीकरणाचे आराखडे हे पुरातन वास्तू जतन समितीच्या मंजूरीसाठी पाठविण्यात आले आहेत. पुरातन वास्तू जतन समितीची मंजुरी दिनांक १३.१.२०१५ रोजीच्या बैठकीत मान्य झाली असून कागदोपत्री लवकरच प्राप्त होईल. त्या मंजुरीसापेक्ष तयार झालेल्या आराखड्यानुसार तलाव नुतनीकरणाचे काम लवकरच सुरु करण्यात येईल.

---

**भडगांव शहरातील (ता.भडगांव, जि.जळगांव) जुने मटन मार्केट ते पेठ गिरणा नदीपात्रात पूल बांधण्याबाबत**

**(४) १३५० (२२-१२-२०१४). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भडगांव शहरातील (ता.भडगांव, जि.जळगांव) जुने मटन मार्केट ते पेठ गिरणा नदीपात्रात शहराचा दोन भागाच्या संपर्कासाठी आवश्यक असलेला पूल बांधण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रस्तावावर केव्हा निर्णय घेण्यात येणार आहे,

(३) निर्णय घेतला असल्यास, त्यांचे स्वरुप काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-१०-२०१५) :**(१) नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गोंदिया जिल्हयातील अंशकालीन पदवीधर कर्मचा-यांना शासकीय सेवेत सामावून घेणेबाबत**

**(५) ४१९१ (२३-१२-२०१४). श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्हयातील अंशकालीन पदवीधर कर्मचा-यांना अद्याप शासकीय सेवेत सामावून घेण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कर्मचारी जवळपास २० वर्षापासून कंत्राटीस्वरुपात काम करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कर्मचा-यांना शासकीय सेवेत सामावून घेण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०२-२०१५) :**(१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गोंदिया जिल्हयातील बेरोजगार सेवा संस्थांच्या मागण्या प्रलंबित असल्याबाबत**

**(६) ४२०२ (२३-१२-२०१४). श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्हयातील बेरोजगार सेवा संस्थांच्या मागण्या गेल्या १५ वर्षापासून प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील जवळपास ८ हजार ५०० बेरोजगार सेवा संस्था कार्यरत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रलंबित मागण्या शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०२-२०१५) :**(१) हे खरे नाही.
(२) महाराष्ट्र राज्य बेरोजगारांच्या एकूण ८३४५ सेवा सहकारी संस्था असून त्यापैकी ३५११ सेवा सहकारी संस्था कार्यरत आहेत.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील म्हाडाच्या ५६ वसाहती असून म्हाडाने त्यांचा पुनर्विकास अथवा दुरुस्ती न केल्याबाबत

**(७) ४२०३ (२३-१२-२०१४). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील म्हाडाच्या ५६ वसाहती असून म्हाडाने त्यांचा पुनर्विकास अथवा दुरूस्ती मागील अनेक वर्षापासून न केल्यामुळे इमारतीमधील रहिवाशांचा जीव धोक्यात आल्याचे माहे ऑक्टोबर-नोव्हेंबर, २०१४ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच नेहरूनगर, कुर्ला (पुर्व) मुंबई येथील सुमारे १५० ते २०० इमारतींच्या म्हाडाच्या वसाहतीमध्ये म्हाडाने मागील ३ ते ४ वर्षापासून दुरूस्ती न केल्यामुळे रहिवाशी त्रस्त झालेले आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त इमारतींची दुरुस्ती न करता संबंधित गृहनिर्माण संस्थेने चटई क्षेत्र म्हाडासमवेत विभागून घ्यावे अशी अट टाकून व एकतर्फी निर्णय घेऊन म्हाडाने दिनांक ५ मे, २००९ च्या ठरावाद्वारे घेतला आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त एकतर्फी निर्णयामुळे या इमारतींचा पुनर्विकास करण्यासाठी एकही विकासक तयार होत नसल्यामुळे या इमारती कोणत्याही क्षणी दुर्घटनाग्रस्त होऊन मोठ्या प्रमाणात जिवीत व वित्तहानी होईल, हेही खरे आहे काय,
(५) असल्यास, या इमारतींचा पुर्नविकास करावा तसेच कलम २ सी (१) रद्द करण्याबाबत स्थानिक रहिवाश्यांना वारंवार निवेदने तसेच मोर्चे निदर्शनाद्वारे ही बाब म्हाडाच्या लक्षात आणून दिली, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीअंती म्हाडाच्या चटईक्षेत्र देण्याचे धोरणामधील २ सी (१) ही अट रद्द करण्यास तसेच कुर्ला नेहरुनगर येथील इमारतींचा पुनर्विकास करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०२-२०१५)** :(१) व (२) हे खरे नाही.

नेहरुनगर, कुर्ला ही म्हाडाची जुनी वसाहत असून यामध्ये सुमारे १५५ इमारतींचा अंतर्भाव असून मंडळाच्या प्रचलित धोरणानुसार म्हाडामार्फत बहुतांश इमारतीतील अभिहस्तांतरण त्या-त्या इमारतींच्या सहकारी गृहनिर्माण संस्थांना केले आहे. या वसाहतीच्या दुरुस्ती/देखभालची जबाबदारी संबंधित रहिवाशांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेची आहे.

(३), (४), (५) व (६) हे खरे नाही.

सर्वसामान्यांसाठी गृहनिर्माण करण्यासाठी म्हाडा कटीबध्द असून म्हाडा वसाहतीच्या पुनर्विकासात अधिमुल्य स्विकारण्याऐवजी सर्वसामान्यांना वितरीत करण्यासाठी तयार घराच्या स्वरुपात मोबदला घेणे अधिक हितावह असल्यने प्राधिकरणाने ठराव क्र. ६५०७ दि.२०.०९.२०१० पूर्वी प्राप्त झालेल्या पुनर्विकास प्रस्तावांना विकास नियंत्रण नियमावलीतील नियम क्र. ३३ (५) २ C (ii) नुसार आकारणी करुन आणि दि.२०.०९.२०१० पासून पुढे प्राप्त झालेल्या पुनर्विकास प्रस्तावांना विकास नियंत्रण नियमावलीतील नियम क्र. ३३ (५) २ C (i) नुसार बांधीव गाळे घेण्याचे धोरण स्विकारण्यात आले होते.

सर्वसामान्यांना परवडणा-या घरांची उपलब्धता वाढविण्याची गरज व त्यासाठी मुंबईत म्हाडाकडे जमिनीची असलेली मर्यादीत उपलबधता लक्षात घेता बांधकाम स्वरुपात मोबदला घेण्याचे म्हाडाची गरज रास्त असली तरी त्यामध्ये सुधारणा होण्याच्या दृष्टीने विकास नियंत्रण नियमावली ३३(५) च्या अनुषंगाने ३.०० चटईक्षेत्र निर्देशांक देण्याबाबत नगरविकास विभाग क्र.टिपीबी-४३०१/१२३/प्रक्र.४७/२०१३/नवि-११, दि.४.५.२०१३ अन्वये प्रारुप अधिसुचना शासन राजपत्रात जनतेच्या सुचना/आक्षेप काही असल्यास ते मागविण्यासाठी प्रसिध्द करण्यात आली. त्या अनुषंगाने नगरविकास विभाग क्र.टिपीबी-४३०९/१२३/प्रक्र.४७/२०१३/नवि-११, अंतीम अधिसूचना दिन.८.१०.२०१३ रोजी शासन राजपत्रात प्रसिध्द झालेली आहे. त्यानुसार विकास नियंत्रण नियमावली ३३(५) च्या पुनर्विकास प्रस्तावांवर म्हाडाकडून कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**पुणे महानगरपालिकेतील शाळांमधील पटसंख्या घटल्याबाबत**

**(८) ४२२५ (२३-१२-२०१४). श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेतील शाळामध्ये पटसंख्या मागील शैक्षणिक वर्षाच्या प्रमाणात चालू वर्षा मध्ये घटली आहे हे खरे आहे काय, असल्यास,

(२) विदयार्थी पटसंख्या घटण्याची नेमकी कारणे काय आहेत,

(३) मनपा शाळातील विदयार्थी पटसंख्या वाढविण्यासाठी तसेच झोपडपट्टी परिसरातील मागास विदयार्थ्यांना प्राथमिक शिक्षण देण्यासाठी मनपाने काय उपाययोजना केल्या आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०५-२०१५)** :(१) होय.

(२) <u>विद्यार्थी पटसंख्या घटण्याची कारणे</u> :-

१) शिक्षण हक्क कायदा अंतर्गत मोफत २५ टक्के शालेय प्रवेश प्रक्रियेत खाजगी अनुदानित/विना अनुदानित शाळांमधून होणारे प्रवेश,

२) खाजगी इंग्रजी शाळांमधून शिक्षण घेण्याचा पालकांचा कल,

३) महानगरपालिका हद्दीतील बांधकामावर काम करणाऱ्यांची मुले उपनगरातील शाळेत स्थलांतरित होणे.

(३) शिक्षण मंडळामार्फत महानगरपालिकेच्या शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना समुपदेशन योजना, वाचन वर्ग, संगणक शिक्षण, कला क्रिडा स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रम इत्यादी तसेच गणवेश,बुटमोजे,दप्तर/पाटी,शैक्षणिक लेखन साहित्य, क्रमिक पुस्तके, क्रीडा साहित्य इत्यादी सुविधा मोफत पुरविल्या जातात. तसेच शासनामार्फत शालेय पोषण आहार पुरविला जातो. त्याशिवाय १ किलोमीटर पेक्षा जास्त अंतरावर राहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वाहतुक खर्च केला जातो.

---

**मुंबईतील डॉकयार्ड येथील भाजी मंडईची इमारत कोसळल्याप्रकरणी**
**चार सनदी अधिकारी दोषी आढळून आल्याबाबत**

**(९) ४७३४ (२३-१२-२०१४). श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील डॉकयार्ड येथील भाजी मंडईची इमारत कोसळल्याप्रकरणी दोषी आढळून आलेल्या चार सनदी अधिका-यांना महानगरपालिका प्रशासनाने दोषी ठरविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली अाहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार दोषी आढळून आलेल्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०८-२०१५) :**(१) हे खरे नाही. तथापि, मुंबईतील डॉकयार्ड येथील भाजी मंडईची इमारत कोसळल्याप्रकरणी म्युनिसिपल मजदुर युनियनने ३ अतिरिक्त आयुक्त व महानगरपालिका आयुक्त यांच्याविरुध्द भा.दं.वि.सं. मधील कलम ३०४ सह कलम ३४ व कलम ११४ अन्वये महानगर दंडाधिकारी, ६२ वे न्यायालय, दादर येथे दाखल केलेल्या दाव्यामध्ये मा.न्यायालयाने दिनांक ०५.११.२०१४ रोजी सदर अधिकाऱ्यांविरुध्द नोटीस काढण्याचे आदेश दिलेले आहेत. परंतु सदर आदेशास याचिका क्रमांक ४८२३/२०१४ अन्वये मा.उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले आहे. मा.उच्च न्यायालयाने महानगर दंडाधिकारी यांच्या दिनांक ०५.११.२०१४ रोजीच्या आदेशास दिनांक १२.१२.२०१४ रोजी स्थगिती दिली असून सदर याचिका मा.उच्च न्यायालयात प्रलंबित आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील भगवती व शताब्दी या महापालिका रुग्णालयात प्रभावी न्युरोलॉजिकल (मज्जासंस्था) शाखा निर्माण करण्याबाबत**

**(१०) ८४६७ (०७-०४-२०१५). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील भगवती व शताब्दी या महापालिका रुग्णालयात प्रभावी न्युरोलॉजिकल (मज्जासंस्था) शाखा निर्माण करण्याबाबत दिनांक १६ जानेवारी, २०१५ रोजी स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.आरोग्यमंत्री महोदयांकडे निवेदनाव्दारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घटनेची चौकशी करण्यात आल आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने केलेल्या मागणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०८-२०१५) :**(१) हे खरे आहे.

(२) व (३) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सर्वसाधारण रुग्णालयांमध्ये माध्यमिक आरोग्य सेवा पुरविण्यात येतात. न्युरोलॉजी शाखा ही अतिविशेषोपचार शाखा या प्रकारात मोडते व त्यासाठी महापालिकेच्या राजे एडवर्ड स्मारक रुग्णालय, नायर रुग्णालय व लोकमान्य टिळक महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालय येथे उपचाराची सोय उपलब्ध आहे. भगवती रुग्णालयाचा पुनर्विकास सुरु असल्याने तेथील सुविधा कांदिवली पश्चिम येथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर रुग्णालय येथे स्थलांतरीत करण्यात आल्या आहेत. तेथे मानसेवी मज्जासंस्था शल्यचिकित्सकांमार्फत बाह्य रुग्ण व आंतररुग्णांना आवश्यकतेनुसार सल्ला व उपचारांची सेवा पुरविण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**इचलकरंजी (जि.कोल्हापूर) येथे कामगार न्यायालयाचे कॅम्प कार्यालय सुरु करण्याचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असल्याबाबत**

**(११) ८५४९ (०७-०४-२०१५). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इचलकरंजी (जि.कोल्हापूर) येथे कामगार न्यायालयाचे कॅम्प कार्यालय सुरु करण्याचा प्रस्ताव गेल्या तीन वर्षापासून शासनाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, न्यायाधिश कंथारिया समितीच्या शिफारशीस अनुसरुन ८०० ते १००० प्रकरणांसाठी एक कामगार न्यायालय स्थापन करण्याच्या प्रस्ताव आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर न्यायालयात स्थापन केव्हापर्यंत होणे अपेक्षित आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (२८-०५-२०१५)** :(१) व (२) नाही.
इचलकरंजीची प्रलंबित प्रकरणांची संख्या (२१३) लक्षात घेता तेथे नवीन कामगार न्यायालय स्थापन करण्याचा कोणताही प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील सुशिक्षीत बेरोजगार तरुण-तरुणींना प्रभावी पध्दतीने रोजगार उपलब्ध होण्याबाबत**

**(१२) ८५५१ (०७-०४-२०१५). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सुशिक्षीत बेरोजगार तरुण-तरुणींना प्रभावी पध्दतीने रोजगार उपलब्ध होण्यासाठी विधीमंडळाने गठीत केलेल्या रोजगार व स्वयंरोजगार समितीने तत्कालीन उपमुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली बैठक होवून कौशल्य विकासावर भर देण्याच्या शिफारशी शासनास सादर केल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर समितीने केलेल्या शिफारशीचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे व शिफारशीची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे अथवा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०५-२०१५)** :(१) हे अंशत: खरे आहे.
दि. ०७.०१.२०१४ रोजी मा. उपमुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली विधीमंडळाने गठीत केलेल्या समितीची बैठक पार पडली. तथापि, विधीमंडळ समितीच्या अंतिम शिफारशीचा अहवाल शासनास अद्याप सादर झालेला नाही.
(२) दि. ०७.०१.२०१४ च्या बैठकीस अनुलक्षून रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राचे व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन केंद्रात रुपांतर करणे ही योजना प्रथम टप्प्यात मुंबई उपनगर, औरंगाबाद, नागपूर, सांगली व सिंधुदुर्ग जिल्ह्यात राबविण्यासाठी दि. १९.०५.२०१४ च्या रोजगार व स्वयंरोजगार विभागाच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.
(३) मा. राज्यमंत्री, रोजगार व स्वयंरोजगार यांचे अध्यक्षतेखाली स्थापित विधीमंडळाच्या समितीची पुनर्रचना करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**किलोनी (ता.भद्रावती, जि.चंद्रपूर) येथील कर्नाटका**
**एम्टा कोल माईन्स लिमि. च्या निवेदनाबाबत**

**(१३) ८६७९ (०९-०४-२०१५). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **खनिकर्म मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्नाटका एम्टा कोल माईन्स लिमि., किलोनी (ता.भद्रावती, जि.चंद्रपूर)बाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ६ जानेवारी, २०१५ रोजीच्या सुमारास मा.उद्योग मंत्री,महाराष्ट्र राज्य यांना एक लेखी निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (०८-०५-२०१५) :**(१) होय.
(२) व (३) निवेदनामध्ये उपस्थित केलेल्या बऱ्याच मुद्यांची पूर्तता कर्नाटका एम्टा कोल माईन्स लिमिटेड कंपनीकडून पूर्तता करण्यात आली असून उर्वरित मुद्यांबाबत पूनर्वसन करारनाम्या प्रमाणे उर्वरित मुद्यांची पूर्तता करण्यात येईल, असे कंपनीने कळविले असल्याचे जिल्हाधिकारी चंद्रपूर यांनी कळविले आहे.

---

## मुंबईतील गिरगांव चौपाटीवरील लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांच्या समाधीस्थळाला स्वराज्यभूमी नामकरण करण्याबाबत

**(१४) ८७९२ (०७-०४-२०१५). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील गिरगांव चौपाटीवरील लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांच्या समाधीस्थळाच्या नामकरणाचा ठराव एकमताने संमत करुन मुंबई महानगरपालिकेने शासनाकडे पाठवून आज चार वर्षाचा कालावधी होऊनही नामकरणाची नस्ती शासनाकडे धुळखात पडून असल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने गिरगांव चौपाटीच्या स्वराज्यभूमी नामकरणास अनुकूलता दर्शवून प्रस्ताव मंजूर करावा अशी मागणी लोकमान्य टिळक स्वराज्यभूमी स्मारक समितीने केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर नामकरणास मंजूरी मिळण्यास विलंब लागण्यामागची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(५) तद्नुसार पुढे कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०८-२०१५) :**(१) व (२) लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचे स्मारक गिरगांव चौपाटी येथे असल्याने, गिरगांव चौपाटीस “स्वराज्यभूमी” असे नाव देण्यास शासनाने दिनांक १७.३.२०१५ रोजीच्या शास निर्णयान्वये मान्यता दिली आहे.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बेकायदा झोपड्यांतील रहिवाश्यांना पाणी पुरवठा करणेबाबत**

**(१५) ८८७३ (०७-०४-२०१५). श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील बेकायदा झोपडयात राहणाऱ्या रहिवाशांच्या जगण्याच्या अधिकारास प्राधान्य देवून दिनांक १ जानेवारी, २००० नंतर उभारलेल्या झोपडयांतील रहिवाशांना पिण्याचे पाणी देण्याचे आदेश मा.उच्च न्यायालयाने दिनांक १५ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास मुंबई महानगरपालिका व शासन यांना दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई शहरात पाण्याचे योग्य नियोजन व्हावे यासाठी पाणी पुरवठयाचे नवे धोरण ठरविण्याचीही सूचना न्यायालयाने दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने पाणी पुरवठयाचे कोणते नवे धोरण ठरविले वा ठरविण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाचे कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०८-२०१५) :**(१) व (२) हे खरे आहे.

(३) सन २००० नंतर झोपडपट्टीतील रहिवाशांना पाणी पुरवठा करण्यासंबंधी धोरणाचा मसुदा तयार करुन ते स्थायी समिती व महानगरपालिका सभागृहाच्या मंजुरीसाठी सादर करण्यात आला आहे. मंजूरीनंतर सदर धोरण बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे राबविण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे जिल्ह्यातील उल्हासनगर महापालिका क्षेत्रात वडोल गाव येथे सेंट जोसेफ इंग्रजी माध्यमाची तसेच कॅम्प तीन येथे चोपडा कोर्ट परिसरात लॉड कॉन्व्हेंट स्कुल या शाळा चालकाने महानगरपालिकेची परवानगी न घेता वाढीव बांधकाम केल्याबाबत**

**(१६) ८९७४ (०७-०४-२०१५). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील उल्हासनगर महापालिका क्षेत्रात वडोल गाव येथे सेंट जोसेफ इंग्रजी माध्यमाची तसेच कॅम्प तीन येथे चोपडा कोर्ट परिसरात लॉड कॉन्व्हेंट स्कुल या शाळा चालकाने महानगरपालिकेची परवानगी न घेता वाढीव बांधकाम केल्यामुळे या शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या जीवीताला धोका निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संबंधात चौकशी करण्यात आहे काय, तद्नुसार संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०८-२०१५) :**(१) व (२) हे खरे नाही. उल्हासनगर महापालिका क्षेत्रातील वडोल गांव येथील सेंट जोसेफ बेथनी कॉन्व्हेंट स्कूल या इंग्रजी माध्यमाच्या शाळेचे बांधकाम नियमाधीन करण्यास मंजूरी मिळाली आहे. तथापि सदर शाळेच्या आवारात वाढीव बांधकाम केल्यामुळे मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम २६०, २६८ (१) अन्वये उल्हासनगर महापालिकेने संबंधितास वाढीव अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्याबाबत नोटीस बजावली होती. परंतु सदर ठिकाणी शाळा भरत असल्यामुळे व इमारत रिकामी न केल्यामुळे निष्कासनाची कार्यवाही केली नाही. तथापि प्रचलित नियमांच्या अधीन राहून निष्कासनाची कार्यवाही तात्काळ करण्याच्या सूचना उल्हासनगर महानगरपालिकेस देण्यात आल्या आहेत.

लॉर्ड कॉन्व्हेंट स्कूल, चोपडा कोर्ट, उल्हासनगर-३ या शाळेच्या विकासकाने मंजुर नकाशा व्यतिरिक्त वाढीव बांधकाम केल्यामुळे महापालिकेने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५२, ५३ अन्व्ये नोटीस बजावण्यात आली आहे. त्यावर सदर विकासकाने मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका क्रमांक ६३६१/२०१४ दाखल केली असून, मा.न्यायालयाने सदर बांधकामचे निष्कासन करण्यास स्थगिती आदेश दिलेले आहेत. सदर प्रकरण अद्यापि न्यायप्रविष्ठ आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई घाटकोपर पंतनगर येथील ब्रम्हकुमारी या संस्थेच्या ताब्यातील मैदानाबाबत

**(१७) ९००४ (०६-०४-२०१५). श्री.संजय कदम (दापोली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई घाटकोपर पंतनगर येथील ब्रम्हकुमारी या संस्थेच्या ताब्यात असलेला मैदांनाचा भाग महापालिका प्रशासनाने ताब्यात घेऊन सामान्यांसाठी खुला करण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने कोणती कार्यवाही वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०८-२०१५) :**(१) घाटकोपर पंतनगर येथील आचार्य अत्रे खेळाचे मैदान हे मे.वर्ल्ड रिन्युअल स्पिरिच्युअल (ब्रम्हकुमारीज) या संस्थेस दत्तक व देखभाल तत्वावर दिनांक १६.९.१९९९ ते १५.०९.२०१४ पर्यंत देण्यात आले होते. तथापि सदर खेळाच्या मैदानाचा गैरवापर करणे व मैदानाच्या काही भागात सामान्य नागरिकांना प्रवेश नाकारत असल्याबाबत प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने महापालिका प्रशासनाने सदर मैदानाचा ताबा महानगरपालिकेकडे घेण्याचा निर्णय घेतला आहे.

(२) आचार्य अत्रे मैदानाचा ताबा महापालिकेकडे हस्तांतरीत करण्याकरिता ब्रम्हकुमारी या संस्थेस महानगरपालिकेमार्फत नोटीस देण्यात आली होती. सदर नोटीशीविरुध्द या संस्थेने

मा.शहर दिवाणी न्यायालयात सुट क्रमांक २२६५/२०१४ अन्वये याचिका दाखल केली होती. परंतु मा.शहर दिवाणी न्यायालयाने सदर संस्थेच्या बाजूने स्थगिती आदेश पारित न केल्याने संस्थेने मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल केली असून, सदर प्रकरण सध्या न्यायप्रविष्ठ आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिका परिवहन महामंडळाकडील बसेस चालविण्याकरीता ठेकेदारी तत्वावर काम करणाऱ्या कंत्राटी कामगारांना कमी वेतनावर काम करावे लागत असल्याबाबत

**(१८) ९२३८ (०६-०४-२०१५). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिका परिवहन महामंडळाकडील बसेस चालविण्याकरीता ठेकेदारी तत्वावर काम करणाऱ्या ४००० च्यावर कंत्राटी कामगारांना किमान वेतना पेक्षाही कमी वेतनावर काम करावे लागत असल्याचे माहे डिसेंबर २०१४ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे का ?

(२) असल्यास, महानगरपालिका किमान वेतन कायद्याचा भंग करत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, किमान वेतन कायद्याचा भंग करणाऱ्या ठेकेदारावर शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०८-२०१५) :**(१) पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या बसेसवर कंत्राटी चालक सेवकांच्या नियुक्ता करण्यात आलेल्या नाहीत. तथापि, महामंडळाने भाडेतत्वावर घेतलेल्या बसेस आज रोजी संचालनाकामी उपलब्ध असून, संबंधित ठेकेदारांनी चालक सेवकांच्या नियुक्ता त्यांच्या संस्थेमार्फत केलेल्या आहेत.

(२) व (३) ठेकेदार यांनी त्यांचे संस्थेमार्फत नियुक्त केलेल्या चालक सेवकांबाबत कामगार कायद्याच्या तरतूदीनुसार अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.यांचेकडून तपासणी करण्यात येत आहे.

संबंधित ठेकेदारांकडून किमान वेतन कायद्यानुसार पूर्ततेमध्ये काही त्रुटी राहिल्यास त्याची पूर्तता करण्यासाठी त्यांच्या संचलनाच्या देय बिलाच्या ३० टक्के रक्कम राखून ठेवलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे महानगरपालिकेतील शिक्षण मंडळाला पूर्वीप्रमाणेच आर्थिक अधिकार देण्याचा प्रस्ताव**

**(१९) ९३९७ (०७-०४-२०१५). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेतील शिक्षण मंडळाला पूर्वीप्रमाणेच आर्थिक अधिकार देण्याचा प्रस्ताव दिनांक २० जानेवारी, २०१५ रोजी पुणे महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेने मंजुर करुन शासनाकडे अंतिम मंजुरी मिळावी यासाठी पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शिक्षण हक्क कायदा आणि मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार शासनाने शिक्षण महामंडळ बरखास्त केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याची कारणे काय होती व सद्यःस्थितीत पाठविलेल्या प्रस्तावास शासनाने मंजुरी दिली आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०८-२०१५) :**(१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुणे महानगरपालिकेने उभारलेल्या बी.आर.टी. रस्त्यावरील**
**अनेक बस थांब्यात चोरी झाल्याबाबत**

**(२०) ९६६९ (०६-०४-२०१५). श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेने उभारलेल्या बी.आर.टी. रस्त्यावरील अनेक बस थांब्यात काही भागाची चोरी झाली असल्याचे दिनांक ३० ऑक्टोबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जेएनएनयुआरएम अंतर्गत होणाऱ्या रस्त्यावरील बस थांबे व त्यांच्यावरील वस्तुची सुरक्षा करण्याची जबाबदारी नेमकी कुणाची आहे,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०८-२०१५) :**(१) होय.

(२) सद्य:स्थितीत सदर जबाबदारी पुणे महानगरालिकेची आहे. पुणे महानगरपालिकेकडून बीआरटी सुरु झाल्यानंतर, सदरचे बस थांबे परिवहन महामंडळाकडे हस्तांतरीत होतील त्यानंतर थांब्याची सुरक्षा महामंडळामार्फत ठेवली जाणार आहे.

(३) पुणे महानगरपालिकेने आळंदी रस्ता, नगर रस्ता, संगमवाडी रस्ता या एकूण १६ कि.मी.. लांबीच्या बी.आर.टी.एस. कॉरीडोर मार्गामध्ये बांधण्यात आलेल्या बसस्थांब्यावर दिनांक १३.२.२०१५ पासून टप्प्याटप्प्याने सुरक्षकांची नेमणूक पुणे महानगरपालिकेमार्फत करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुणे-पिंपरी-चिंचवड महानगरपालिका येथे एएनएम, जीएनएम व सार्वजनिक आरोग्य परिचारक रिक्त पदांबाबत**

**(२१) ९६७१ (०६-०४-२०१५). श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे-पिंपरी-चिंचवड महानगरपालिका येथे एएनएम, जीएनएम व सार्वजनिक आरोग्य परिचारीकरिता यांची दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१४ अखेर किती पदे रिक्त आहेत,
(२) सदर पदे भरण्यासाठी महानगरपालिका प्रशासनाने कोणती कार्यवाही केलेली आहे,
(३) पुणे-पिंपरी-चिंचवड महानगरपालिका येथे सार्वजनिक आरोग्य परिचारिकांची पदे रिक्त ठेवण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०८-२०१५) :**(१) दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१४ अखेर पुणे महानगरपालिकेत एएनएम (ऑक्झिलरी नर्स)-१५, जीएनएम (ज्युनिअर नर्स)-२८ एकूण ४३ पदे तर पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेत एएनएम-२, स्टाफनर्स (जीएनएस)-२२ व पब्लिक हेल्थ नर्स (सार्वजनिक आरोग्य परिचारीका)-४ अशी एकूण २८ पदे रिक्त आहेत.
(२) पुणे महानगरपालिकेमध्ये जीएनएम (ज्युनिअर नर्स) या पदाकरिता दिनांक १६.५.२०१२ रोजी देण्यात आलेल्या जाहिरातीनुसार सेवक निवड समितीने तयार केलेल्या निवडयादी/अतिरिक्त निवडयादी मधील ८ उमेदवारांची नियुक्ती दिनांक ८.३.२०१५ रोजी करण्यात आली आहे. पुणे महानगरपालिकेमधील एएनएम (ऑक्झिलरी नर्स), जीएनएम (ज्युनिअर नर्स) या पदांचे आरक्षण मागासवर्ग कक्षाकडून दिनांक ३०.७.२०१४ रोजी तपासून घेण्यात आले. तद्‌नंतर मराठा-मुस्लिम आरक्षामध्ये बदल झाला. त्याप्रमाणे रोस्टर तयार करण्याची प्रक्रिया चालू करण्यात आली होती. सदर आरक्षणावर मे.न्यायालयाने स्थगिती दिल्याने पुन्हा जुन्या आरक्षण पध्दतीनुसार रोस्टर तयार करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. सबब सदरची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही रोस्टर स्थिती निश्चित झाल्यानंतर निश्चित करण्यात येणाऱ्या आरक्षणानुसार भरती प्रक्रिया करण्यात येणार आहे.
पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेमध्ये सदर पदे भरणेबाबत जाहिरात प्रसिध्द करणेची कार्यवाही चालू आहे.
(३) वरील प्रशासकीय कारणास्तव सार्वजनिक आरोग्य परिचारिकांची पदे रिक्त राहिलेली आहेत.

---

**कुर्ला (पश्चिम) परिसरामध्ये दफनभूमी नसल्याबाबत**

**(२२) ९७९८ (०७-०४-२०१५). श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुर्ला (पश्चिम) परिसरामध्ये दफनभूमी नसल्यामुळे या परिसरातील मुस्लिम मृत व्यक्तीला अंत्यसंस्कारासाठी कुर्ला (पूर्व) येथील कसाईवाडा दफनभूमीमध्ये रेल्वे स्टेशन पार करून जावे लागत असल्यामुळे त्यांच्याकरिता प्रभाग क्र १५८ , कल्पना टॉकीसमोर, कुर्ला डेपो समोरील मकसूद इस्टेट, किस्मत नगर, नसीबुल्लाह कंपाउंड, येथे जागा राखीव असून सदर जागा महानगरपालिकेने हस्तांतरित केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्यस्थितीमध्ये सदर जागेवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झालेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर जागेवरील अतिक्रमण हटवून या जागेवर कब्रस्तान आणि उद्यान विकसित करण्याबाबत शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०८-२०१५) :**(१) सदर जागेवर सी.टी.एस.क्र. ४०४, ४०५, ४०६/६, ४११, ४०७, ४०९ बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मालकीची आहेत व सदर जागा मोहमदेन कब्रस्तान, जी विश कब्रस्तान व मध्यवर्ती कब्रस्तानकरीता आरक्षित आहे.

(२) हे खरे आहे.

(३) सदर जागेवरील अतिक्रमणाचे सर्वेक्षण करण्यासाठी निविदा मागवून कार्यादेश देण्याची प्रक्रिया बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सुरु आहे. सदर जागेचे सर्वेक्षण झाल्यानंतर सदर जागेवरील अतिक्रमण हटविण्यात येईल व ही जागा मुस्लिम कब्रस्तानासाठी विकसित करुन वापरण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शिवाजीनगर मानुखुर्द (बृहन्मुंबई महानगर पालिका एम पूर्व प्रभाग) अंतर्गत शताब्दी रूग्णालयाची श्रेणी वाढ व वैद्यकीय महाविद्यालयाची स्थापना करण्याबाबत**

**(२३) १०२३३ (०९-०४-२०१५). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिवाजीनगर मानुखुर्द (बृहन्मुंबई महानगर पालिका एम पूर्व प्रभाग) अंतर्गत शताब्दी रूग्णालयाची श्रेणी वाढ व वैद्यकीय महाविद्यालयाची स्थापना करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी, सेवाभावी संघटना व त्यांचे पदाधिकारी यांनी मा.मुख्यमंत्री मा.मंत्री (सार्वजनिक आरोग्य व वैद्यकीय शिक्षण) राज्यमंत्री (सार्वजनिक आरोग्य व वैद्यकीय शिक्षण), प्रधान सचिव (सार्वजनिक आरोग्य व वैद्यकीय शिक्षण), संबंधित महापलिका आयुक्त उत्तर पूर्व उपनगरे व अतिरिक्त महापालिका आयुक्त (उत्तर पूर्व उपनगरे परिक्षेत्र) यांचेकडे माहे डिसेंबर २०१४ मध्ये वा त्यासुमारास लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने उक्त निवेदनाच्या अनुषंगाने कोणता निर्णय घेतला व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०८-२०१५) :**(१) हे खरे आहे.
(२) शताब्दी रुग्णालय हे २१० रुग्णशय्येचे रुग्णालय असून वैद्यकीय महाविद्यालय उभारण्यासाठी ४६० खाटांची आवश्यकता आहे. शताब्दी रुग्णालयाकरिता आरक्षित असलेला भूखंड ८.३१ एकर आहे. तेथे वैद्यकीय महाविद्यालय बांधण्यासाठी हा भूखंड पुरेसा नसून अजून २ एकर भूखंडाची आवश्यकता आहे. यासाठी रुग्णालयाच्या भोवतालच्या परिसरामध्ये २ एकर भूखंड एमएमआरडीए मार्फत उपलब्ध होण्याची शक्यता आहे. तद्नंतर सदर रुग्णालयाचे विस्तारीकरण करुन तेथे वैद्यकीय महाविद्यालय उभारणेबाबत पुढील निर्णय बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत घेण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### ठाणे जिल्हयातील वाहतुक कोंडी सोडविण्यासाठी ठाणे-भिवंडी-कल्याण भागातील वाहतुक व्यवस्था सुधारण्याबाबत

**(२४) १०५९३ (०६-०४-२०१५). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.सुभाष साबणे (देगलूर), श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्हयातील वाहतुक कोंडी सोडविण्यासाठी ठाणे-भिवंडी-कल्याण भागातील वाहतुक व्यवस्था सुधारण्यासाठी आवश्यक प्रकल्पांच्या तांत्रिक-आर्थिक व्यवहार्यता अहवाल तयार करण्यासाठी एमएमआरडीएने दिनांक १२ जानेवारी,२०१५ रोजी मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रश्नी घेतलेल्या निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार ठाणे जिल्हयातील वाहतुकीची समस्या दिवसेंदिवस गंभीर बनत चाललेली असल्याने वाहतुकीची समस्या सोडविण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०८-२०१५) :**(१) होय.
(२) ठाणे-भिवंडी-कल्याण (२३.७५ कि.मी.) या मार्गाकरीता मोनोरेल प्रकल्पाचा तांत्रिक-आर्थिक सुसाध्यता अभ्यास सल्लागारामार्फत माहे डिसेंबर, २०११ साली तयार करुन शासनास माहे सप्टेंबर, २०१३ मध्ये सादर केला. त्यास अनुसरुन तांत्रिक-आर्थिक सुसाध्यता अहवाल सुमारे १० वर्षापूर्वी केलेल्या सर्वंकष परिवहन अभ्यास (सन २००५) च्या सर्वेक्षणावर आधारीत असून या दशकातील सभोवतालच्या परिसरातील होणारा संभाव्य जलद विकासाचा विचार करुन

परिसरातील दैनंदिन वाहतूक प्रवाशांची संख्या पुनश्च: अंदाजित करणे, मोनोरेल आरेखनात बदल करावे किंवा कसे त्याबाबतची शक्यता तपासणे तसेच उपलब्ध असणाऱ्या सर्व तंत्रज्ञानाचा विचार करुन कार्यक्षम वाहतूक प्रणालीच्या निवडीबाबतचा अभ्यास सल्लागारामार्फत तयार करण्याबाबत शासनाने निर्देश दिले होते. त्यानुषंगाने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने ठाणे-भिवंडी-कल्याण मार्गासाठी योग्य सार्वजनिक जलद वाहतूक व्यवस्थेचा तांत्रिक-आर्थिक सुसाध्यता आणि सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी मे. डी' अपोलोनिया, इटली आणि TCE, मुंबई (संयुक्त उपक्रम) यांची माहे एप्रिल, २०१५ मध्ये सल्लागार म्हणून नियुक्ती केली असून सदर प्रकल्पाचा अंतिम मसुदा अहवाल जानेवारी, २०१६ अखेर अपेक्षित आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोंडवा खुर्द (जि. पुणे) गावठाण्यातून कौरसरबागकडे जाणाऱ्या रस्त्यावरील पुलाचे कामाबाबत**

**(२५) १०८५९ (०८-०४-२०१५). श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोंडवा खुर्द गावठाण्यातून "कौरसरबागकडे जाणाऱ्या रस्त्यावरील पुलाचे काम अनेक वर्षापासून रखडले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हा पुल धोकादायक असून वाहतुकीसाठी खुला केल्याने अपघात होत आहेत रखडलेले काम त्वरीत पुर्ण करण्यात यावे अशी मागणी नागरिकांनी जानेवारी, २०१५ च्या दरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासन कोणती कार्यवाही करणार आहे वा करीत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०६-२०१५)** :(१) होय, सदर पुलाचे काम प्रत्यक्ष जागेवरील अडथळा करणारे वृक्ष काढणेकरिता परवागनी प्राप्त झाली नसल्याने सुमारे दिड वर्षापासून रखडलेले होते.

(२) होय.

(३) सदर पुलाचे कामास अडथळा करणारे वृक्ष काढणेकरिता वृक्ष प्राधिकरणाने दिनांक १२.१.२०१५ रोजी परवानगी दिली असून. त्यानुसार सदर पुलाचे उर्वरित कामाकरीता नव्याने निविदा मागविणेची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ससाणेनगर हडपसर (जि.पुणे) येथे मोठ्या प्रमाणातहोत असलेली वाहतूकीची वर्दळ**

**(२६) १०८६५ (०६-०४-२०१५). श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ससाणेनगर (हडपसर, जि.पुणे) येथे मोठ्या प्रमाणात वाहतुकीची वर्दळ असते, या चौकीतील वर्दळीमुळे अनेक वेळा अपघात होण्याची शक्यता निर्माण झाल्याने रेल्वे उड्डाणपूल व्हावा अशी मागणी मा.मुख्यमंत्री यांना दिनांक २५/११/२०१४ रोजी स्थानिक लोकप्रतिनिधींनी लेखी स्वरुपात केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रेल्वे उड्डाणपूल व्हावा म्हणून स्थानिक नागरिकांनी अनेक वेळा आंदोलनेही केली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुणे महानगरपालिका यांनी सदर रेल्वे उड्डणपूलाचा प्रस्ताव तयार केला आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रस्तावाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०६-२०१५) :**(१) मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी हडपसर-ससाणेनगर मार्गावरील रेल्वे अंडरपास मंजूर करुन तातडीने काम सुरु करणे याबाबत दिनांक २५/११/२०१४ रोजी मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना लेखी स्वरुपात मागणी केलेली आहे.

(२) होय.

(३) होय.

हडपसर-ससाणेनगर येथील रेल्वे क्रॉसिंगमुळे होणारी वाहतूक कोंडी दूर करणेसाठी पुणे महानगरपालिकेमार्फत प्रथमतः रेल्वे उड्डाणपुलाचे संकल्पचित्र तयार केलेले आहे. तसेच या रेल्वे क्रॉसिंगचे ठिकाणी रेल्वे भुयारी मार्गाचेही संकल्पचित्र तयार करणेत आले. या दोन्ही संकल्पचित्रापैकी रेल्वे भुयारी मार्गाचे संकल्पचित्र हे तांत्रिक दृष्टया जास्त योग्य आहे. तसेच जागेवरील परिस्थिती व पादचाऱ्यासाठी भूयांरी मार्गाचा प्रस्ताव जास्त योग्य आहे. सदर भूयारी मार्गाचा प्रस्ताव आर्थिक दृष्टयाही कमी खर्चाचा आहे.

(४) पूणे महानगरपालिकेमार्फत ससाणेनगर येथे रेल्वे भुयारी (अंडरपास) मार्गाचा प्रस्ताव तांत्रिक दृष्या जास्तत योग्य असल्याने या कामाकरीता जाहिर निविदा दि.२१.०३.२०१३ रोजी मागविणेत आल्या आहेत. सदर निविदा मा.स्थायी समिती ठ.क्र २४२, दिनांक ०४/०६/२०१३ अन्वये मान्य झालेली आहे. तसेच यशस्वी ठेकेदार मे.टी.ॲण्ड टी ग्रुप यांना दिनांक १७/६/२०१३ रोजी कार्यादेश देणेत आलेला आहे. या प्रकल्पाचे सर्व साधारण व तांत्रिक आराखड्यांना रेल्वे विभागाकडून दि. ०५/०१/२०१५ रोजी अंतिम मान्यता प्राप्त झालेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**परभणी शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापासून शहरात जाणाऱ्या मुख्य रस्त्याला ठिकठिकाणी स्थायी, अस्थायी अतिक्रमणांने वेढल्याबाबत**

**(२७) ११०१४ (०७-०४-२०१५). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यापासून शहरात जाणाऱ्या मुख्य रस्त्याला ठिकठिकाणी स्थायी, अस्थायी अतिक्रमणांने वेढले असल्याचे नुकतेच माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्यासमोर विसावा कॉर्नर, स्टेट बँक ऑफ इंडिया, जिल्हा परिषदेच्या अधिकारी, पदाधिकाऱ्यांची निवासस्थाने यांच्यासमोरच सदर अतिक्रमणे मोठ्या प्रमाणात वाढली असून ह्या अतिक्रमणामुळे रहदारीला देखील मोठा अडथळा निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) तद्नुसार सदर अतिक्रमणे तात्काळ हटविण्याबाबत शासनस्तरावर काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०६-२०१५) :**(१) व (२) अंशतःखरे आहे.

डॉ. बाबासाहेब आंबडेकर यांच्या पूतळ्यापासून पुढे जाणा-या रस्त्यावर काही ठिकाणी अस्थायी/तात्पुरती दुकाने आणि काही हातगाड्यांच्या दुकानदारांनी दुकाने थाटल्याने आढळून आले होते. सदरची दुकाने निष्काषीत करण्याची कार्यवाही परभणी शहर महानगरपालिकेतर्फे करण्यात येत आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रामटेक (जि.नागपूर) परिसरातील नगरधन येथे सुर्यलक्ष्मी स्पिनिंग मिल येथील कामगारांवर व्यवस्थापनाद्वारे होत असलेला अन्याय.**

**(२८) १११०९ (०७-०४-२०१५). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रामटेक (जि.नागपूर) परिसरातील नगरधन येथे सुर्यलक्ष्मी स्पिनिंग मिल येथील कामगारांनी व्यवस्थापनाद्वारे होत असलेल्या अन्यायाविरोधात दिनांक १३ जानेवारी, २०१४ रोजीच्या सुमारापासून काम बंद आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कामगारांच्या मागण्यांचे स्वरुप काय आहे व यावर कोणता निर्णय घेतला आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (१६-०६-२०१५)** :(१) हे अंशतः खरे आहे, मात्र सुर्यलक्ष्मी स्पिनिंग मिल येथील कामगारांनी दिनांक ११/१/२०१५ रोजीच्या दुपार पासून कामबंद आंदोलन सुरु केले होते.
(२) कामगारांच्या मागण्याचे स्वरुप खालील प्रमाणे आहे.

(१) सर्व बडतर्फे कामगारांना व निलंबित कामगारांना कामावर घेणे व चालू असलेल्या काही कामगारांची चौकशी थांबविणे.

(२) सर्व बदली कामगारांना स्थायी करणे

(३) मागील दोन वर्षापासून प्रलंबित असलेल्या सर्व कामगारांची पगार वाढ निश्चित करणे.

(४) काम करुन सुध्दा दोन महिन्यांपर्यंत ज्या कामगारांना पगार मिळालेला नाही अशा आर.डब्ल्यू.व एन.डब्ल्यू. कामगारांना त्यांचा पगार देणे.

(५) सर्व फोल्डींग कामगारांना इतर कमगारांचा दर्जा देऊन त्याप्रमाणे सोई सुविधा व पगार वाढ देण्यात यावी.

मुंबई औद्योगिक संबंध अधिनियम, १९४६ अंतर्गत उक्त कारखान्यातील कामगार प्रतिनिधींनी त्यांच्या विविध मागण्यांबाबत व्यवस्थापनास दि.२/०९/२०१३ रोजी "नमुना-एल" देऊन दि.१३/९/२०१३ रोजी अपर कामगार आयुक्त, नागपूर या कार्यालयास "नमुना-एन" सादर करुन समेट कार्यवाही सुरु करण्याकरीता विनंती केली होती. सहाय्यक कामगार आयुक्त, नागपूर व समेटकर्त्यासमक्ष व्यवस्थापन व कामगार प्रतिनिधी यांना वेळोवेळी चर्चा/समेटाकरीता पाचारण करण्यात आले होते. मात्र कामगारांच्या मागण्यांबाबत तडजोड न झाल्यामुळे सदरचे प्रकरण असफल करण्यात येऊन दि.१३/१२/२०१४ रोजीच्या कामगारांच्या मागण्या संदर्भात व्यवस्थापनेस दिलेल्या सूचनेच्या अनुषंगाने अपर कामगार आयुक्त, नागपूर या कार्यालयाने दि.५/१/२०१५, ७/१/२०१५ व ९/१/२०१५ रोजी तडजोडीसाठी बैठक आयोजित केली. बैठकीस कामगार प्रतिनिधी अथवा कामगार उपस्थित नव्हते. शासनाने सदरील मागण्या बाबतचे प्रकरण औद्योगिक न्यायालय, नागपूर येथे अभिनिर्णयायार्थ पाठविले आहे.

दि.८/३/२०१५ रोजी वेतनवाढी व इतर मागण्यांबाबत व्यवस्थापन व कामगारांमध्ये समझोता झाला असून ५७ दिवसांचा संप मागे घेण्यात आला आहे व सदर कराराच्या अनुषंगाने औद्योगिक न्यायालयाने निवाडा दिला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई महानगरपालिकेच्या आर विभागातील लोकसंख्या जास्त असतानाही डिस्पेंसरीची संख्या कमी असल्याबाबत

**(२९) ११३४६ (०७-०४-२०१५). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगरपालिकेच्या आर विभागातील लोकसंख्या जास्त असतानाही डिस्पेंसरीची संख्या कमी आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपनगराच्या पूर्व भागातील रुग्णांना उपचाराकरीता पश्चिम भागात यावे लागते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, डिस्पेंसरीची संख्या वाढविण्याबाबत शासन निर्णय घेणार आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०६-२०१५)** :(१) हे खरे नाही.
(२) हे अंशतः खरे आहे.
(३) सध्या बोरीवली (पूर्व) येथील बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कस्तुरबा क्रॉस रोड प्रसुतीगृहाचे नुतनीकरण करण्यात येत असून १५० खाटांचे सर्वसाधारण रुग्णालय सुरु करण्याचे प्रस्तावित आहे. त्यायोगे रुग्ण सेवेची निकड भागविणे शक्य होईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जळगांव महानगरपालिकेवर नाबार्ड व इतर वित्तीय संस्थांची असलेली करोडो रुपयांची थकीत कर्जे**

**(३०) ११६५८ (०६-०४-२०१५). डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगांव महानगरपालिकेवर नाबार्ड व इतर वित्तीय संस्थांची करोडो रुपयांची कर्ज थकीत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महानगरपालिकेत येणाऱ्या उत्पन्नातून सर्व रक्कम कर्ज फेडण्यातच खर्च होत असल्यामुळे तेथील विकास कामे ठप्प झालेली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या महानगरपालिकेला शासनाने आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०६-२०१५)** :(१) जळगांव महानगरपालिकेने नाबार्ड या वित्तीय संस्थेकडून कर्ज घेतलेले नाही. तथापि, हुडको आणि जळगांव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून तत्कालीन जळगांव नगरपालिकेने घेतलेली कर्जे थकीत आहेत हे खरे आहे,
(२) महानगरपालिकेच्या उत्पन्नाचा काही भाग वरील कर्जाच्या परतफेडीकरिता वापरण्यात येत आहे हे खरे आहे. तथापि, महानगरपालिका निधी, शासकीय अनुदान आणि खासदार-आमदार निधीमधून जळगाव महानगरपालिकेकडून विविध विकास कामे करण्यात आली आहेत.
(३) जळगांव महानगरपालिकेस सन २०१४-१५ करिता १३ वा वित्त आयोग, नागरी दलीतेतर वस्त्यांमधील सुधारणा, महाराष्ट्र सुजल व निर्मल योजना इ. योजनांतर्गत नियमानुसार अनुदान उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

---

**वसई-विरार (जि.ठाणे) येथे मोठ्या प्रमाणात गृहनिर्माण प्रकल्पांची उभारणीबाबत**

**(३१) ११६७८ (०६-०४-२०१५). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार (जि.ठाणे) येथे मोठ्या प्रमाणात गृहनिर्माण प्रकल्पांची उभारणी सुरु असून या सदनिका वितरित करतांना कोणत्याच नागरी मूलभूत सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत नसल्याने सदनिकाधारकांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या भागातील गृहनिर्माण प्रकल्पांला मूलभूत सोयी - सुविधा वेळेवर उपलब्ध करुन न देण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, या भागातील गृहनिर्माण प्रकल्पांना आवश्यक त्या मूलभूत सोयी-सुविधा पुरविण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०७-२०१५) :**(१) नाही.

वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील नागरीकांना मूलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या असून नवीन पायाभूत सुविधा पुरविण्याचे काम प्रगती पथावर आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई उपनगरातील कांदिवली येथील त्रिशूल सोसायटी सिटीएस १२७९/ सी कांदिवली गाव छत्रपती मार्ग येथील इमारतीमध्ये पार्किंगबाबत

**(३२) ११६८० (०६-०४-२०१५). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील कांदिवली येथील त्रिशूल सोसायटी सिटीएस १२७९/ सी कांदिवली गाव छत्रपती मार्ग येथील इमारतीमध्ये पार्किंगसाठी असलेल्या जागेत पोट माळा टाकून तसेच पोट माळ्यावर असलेल्या रहिवाशी सदनिकेचा कार्यालयामध्ये बदल करणे, इमारतीत असलेल्या गॅरेजचा बदल करुन कार्यालय म्हणून वापरण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुसार संबंधित विकासकांवर व संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०६-२०१५) :**(१) होय , हे खरे आहे.
(२) सदर सोसायटीचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने निरीक्षण केले असता, खालील बदल/अनियमित बाबी आढळून आल्या:-

- सदर सोसायटीच्या स्तंभधारित वाहनतळामध्ये (Stilt stack parking) फेरफार करून पोटमाळा टाकून कार्यालये म्हणून वापर करणे.
- पहिल्या मजल्यावरील वायुविजन हाताळाणी कक्षाचे (A.H.U.Room) चे रुपातर कर्मचारी कक्ष व पॅन्ट्री कक्षामध्ये करणे.

- दुसऱ्या मजल्यावरील निवासी घराचे रुपांतर कार्यालयात करणे.
- तळमजल्यावरील गॅरेजचे रुपांतर कार्यालयात करणे.
- बारा दृकश्राव्य मनोरे गच्चीवर विनापरावाना बसविणे.
- सदर बदलाबाबत संबंधित मालक श्री.रॉबर्ट राज यांच्यावर बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे एम.आर.टी.पी.५३(१) अन्वये नोटीस बजापण्यात आली आहे. तद्नंतर कांदिवली पोलीसांनी सदर जागेचा पंचनामा करुन संबंधित मालकावर प्रथम खबरीय अहवाल दाखल केला असून, पुढील कार्यवाही कांदीवली पोलीस स्टेशनमार्फत करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**घाटकोपर पुर्व येथील १९४ ब या भूखंडावरील झोपडपट्टया धारकांनी स्थापन केल्याबाबत.**

**(३३) ११८४३ (०६-०४-२०१५). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील घाटकोपर पुर्व येथील १९४ ब या भूखंडावरील झोपडपट्टया धारकांनी स्थापन केलेल्या जुनी रमाबाई एस.आर.ए.गृहनिर्माण संस्था या संस्थेस झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासाठी जागेचे ना हरकत प्रमाणपत्र मिळणेसाठी माहे फेब्रुवारी, २००९ मध्ये संबंधित विभागास पाठविलेला प्रस्ताव झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने माहे जानेवारी, २०१५ दरम्यान पाठविण्यात आल्याने सदर प्रस्ताव प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रखडलेली झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासाठी प्रादेशिक विभागाने ना हरकत प्रमाणपत्र देण्याची लोकप्रतिनिधींनी शासनास मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, झोपडपट्टीवासीयांची सदर पुनर्वसन योजना तात्काळ सुरु करण्यासाठी भाग (१) व (२) बाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (२१-०७-२०१५) :**(१) घाटकोपर पूर्व येथील नगर भूमापन क्र. १९४(पै) वरील जुनी रमाबाई सहकारी गृहनिर्माण व संत नामदेव सहकारी गृहनिर्माण संस्था यांच्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेस ना-हरकत प्रमाणपत्र द्यावे म्हणून झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिरणाने दिनांक ३०.११.२०११ च्या पत्रान्वये प्रादेशिक परिवहन कार्यालयास विनंती केली होती. त्यासंदर्भात प्रादेशिक परिवहन विभागाने दि. २४.०९.२०१२ अन्वये शासन स्तरावर गृह विभागाकडे (परिवहन) व त्या विभागाने गृहनिर्माण विभागाकडे प्रस्ताव पाठविला आहे. विकास नियोजन आराखड्यानुसार या मिळकतीवर मोटर परिवहन विभागाचे आरक्षण असून विकास नियंत्रण नियमावली १९९१, ३३(१०) परिशिष्ट IV च्या उपकलम ७.५ नुसार ४५०० चौ.मी. बांधीव आरक्षण प्रस्तावित आहे. परंतु परिवहन विभागाने या ठिकाणी वाहन तपासणी, ड्रायव्हिंग टेस्ट करीता ३ एकर रिकमी जागा उपलब्ध करुन द्यावी ही मागणी केली आहे. त्या

अनुषंगाने प्रोदशिक परिहवन विभागास रिकामी जागा देणे शक्य आहे किंवा कसे याबाबत तपासणी करण्याच्या सूचना शासन स्तरावरून झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास दिल्या आहेत.

(२) मा.लोकप्रिनिधी यांचे दिनांक ६ मे, २०१३ रोजीचे पत्र प्राप्त झाले आहे.

(३) सदर झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या क्षेत्रास सार्वजनिक बांधकाम विभाग, परिवहन विभाग व बृहन्मुंबई महानगरपालिकेशी संबंधित आरक्षणे आहेत. सद्य:स्थितीत परिवहन विभागाशी संबंधित बाब प्रलंबित असून वर नमुद केल्याप्रमाणे प्रादेशिक परिवहन विभागास रिकामी जमीन उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीकोनातून शासन पत्र दि. १५.०१.२०१५ अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून प्रस्ताव मागविला आहे. सदर योजनेस दिनांक १२.४.२०१० रोजी आशयपत्र देण्यात आले आहे. या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये पुनर्वसन व विक्री घटकाच्या अनुक्रमे ९ व ३ इमारती आहेत. पुनर्वसन घटकाच्या सर्व ९ इमारतींच्या जोत्यापर्यंतच्या बांधकामास दिनांक ७.६.२०१२ रोजी परवानगी दिलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे मनपा हद्दीतील रिलायन्स कंपनीने ४ जी केबल टाकण्यासाठी केलेल्या खोदकामातील अनियमिततेची चौकशी करण्याबाबत

**(३४) १३३६८ (०७-०४-२०१५). श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे मनपा हद्दीतील रिलायन्स कंपनीने ४ जी केबल टाकण्यासाठी केलेल्या खोदकामातील अनियमिततेची चौकशी करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी माहे फेब्रुवारी २०१५ वा त्या दरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय निदर्शनास आले व तदनुषंगाने कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०८-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) पुणे शहरात विविध ठिकाणी फोर जी ऑप्टीकल फायबर केबल टाकणेसाठी रिलायन्स जीओ कंपनीने २६२ कि.मी. साठीचा प्रस्ताव दिनांक ९.७.२०१४ रोजी दाखल केलेला होता. त्यास सामान्य प्रशासन विभागाने दिनांक ४.३.२०१३ तसेच माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने दिनांक ७.१२.२०१३ च्या पत्रान्वये दिली आहे.

त्यानुसार आयुक्त, पुणे महानगरपालिका यांच्या मान्यतेने रिलायन्स जीओ कंपनीकडून पुणे महानगरपालिका कोषागारात रुपये १५०,६१,०७,०००/- चलन क्रमांक ११०९१ दिनांक १९.८.२०१४ रोजी भरणा करून घेणेत आला. त्यानुषंगाने रिलायन्स जीओ या कंपनीस खालीलप्रमाणे ३ टप्प्यांमध्ये खोदाईसाठी परवानगी देणेत आलेली होती.

१) ला टप्पा-८ वर्क ऑर्डर, लांबी अंदाजे २३.९२ कि.मी., दिनांक २१.११.२०१४ रोजी दिली होती.

२) २ रा टप्पा - २५ वर्क ऑर्डर, लांबी अंदाजे ५८.९२ कि.मी. दिनांक २४.१२.२०१४ रोजी दिली होती.

३) ३ रा टप्पा - ३० वर्क ऑर्डर, लांबी अंदाजे १०३ कि.मी., दिनांक ९.२.२०१५ रोजी दिली होती.

वरील परवानग्या देणेपूर्वी ओव्हरहेड केबल टाकणार नाही याबाबत हमीपत्र घेणेत आलेले होते.

परवानगीच्या अनुषंगाने विविध त्रुटी व अनधिकृत केबल याबाबत दिनांक ४.३.२०१५ रोजी अतिरिक्त महापालिका आयुक्त यांनी रिलायन्स जीओ कंपनीच्या प्रतिनिधींसमवेत सुनावणी घेतली.

रिलायन्स जीओ कंपनीमार्फत सुमारे ९.३८ कि.मी. लांबीची ओव्हरहेड केबल टाकल्याचे निदर्शनास आल्याने व भुसारी कॉलनी, कोथरुड येथे परवानगी व्यतिरिक्त अन्य ठिकाणी सुमारे १०० मी. लांबीची अनधिकृत खोदाई केल्याने तसेच वर्क ऑर्डरमधील अटींची पुर्तता न झाल्याने दिनांक ७.३.२०१५ अन्वये रिलायन्स जीओ कंपनीकडून चालू असलेली रस्ते खोदाईची सर्व कामे थांबविण्यात आलेली होती.

तद्नंतर रिलायन्स जीओ कंपनीने दिनांक १७.३.२०१५ व २४.३.२०१५ रोजी दाखल केलेल्या पत्राच्या अनुषंगाने भुसारी कॉलनी, कोथरुड येथे टाकलेल्या अनधिकृत केबलपोटी रुपये १६,६४,१००/- व पुणे शहरात विविध ठिकाणी ओव्हेरहेड केबल अनधिकृतपणे टाकल्याने रुपये २,६०,२०,१२०/- इतकी दंडात्मक रक्कमेची कारवाई करणेत आलेली आहे. तसेच ४ थ्या टप्पयामध्ये रिलायन्स जीओ या कंपनीस २७ कार्यादेश लांबी ३९.८५ कि.मी. च्या परवानग्या दिनांक २१.४.२०१५ व दिनांक २२.४.२०१५ रोजी घेणेत आलेली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईतील केईएम रुग्णालयातील जुन्या इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावर चार-ए या महिला शौचालयात तळीरामांनी आपला अड्डा बनविल्याबाबत.**

**(३५) १३५७३ (०७-०४-२०१५). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील केईएम रुग्णालयातील जुन्या इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावर चार-ए या महिला शौचालयात तळीरामांनी आपला अड्डा बनविला असल्याचे दिनांक ५ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने यासंदर्भात चौकशी करुन कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०८-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नाशिक महानगरपालिकेमध्ये कायम केलेल्या रोजंदारी कर्मचाऱ्यापैकी महापालिका प्रशासनाकडून अनावधानाने राहून गेलेल्या चार कर्मचाऱ्यांना कायम सेवेत समावून घेण्याबाबत**

**(३६) १३६२९ (०७-०४-२०१५). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक महानगरपालिकेमध्ये कायम केलेल्या रोजंदारी कर्मचाऱ्यापैकी महापालिका प्रशासनाकडून अनावधानाने राहून गेलेल्या चार कर्मचाऱ्यांना कायम सेवेत समावून घेण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी २०१५ मध्ये वा त्या सुमारास शासनाकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) मा.सर्वोच्च न्यायालयाने निर्णयानंतर कल्याण-डोंबिवली व मालेगाव (जि.नाशिक) महानगरपालिकेमधील रोजंदारी कर्मचाऱ्यांना कायम करणेबाबत शासनाने दि.१६ ऑगस्ट २०१२ रोजी निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्न भाग (२) प्रमाणे नाशिक महानगरपालिकेतील चार कर्मचाऱ्यांना कायम करणेबाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली जात आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०८-२०१५) :** (१) होय.
(२) दिनांक १६ ऑगस्ट, २०१२ च्या शासन निर्णयान्वये रोजंदारी कर्मचाऱ्यांना मालेगाव महानगरपालिकेच्या सेवेत सामावून घेण्याकरीता अधिसंख्य पदे निर्माण करण्यात आली आहेत. मात्र यामध्ये कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांचा समावेश नाही.
(३) कर्नाटक राज्य विरुध्द उमादेवी या प्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेले निदेश तसेच आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांच्या दिनांक ३.१२.२०१३ च्या अहवालानुसार विचाराधीन रोजंदारी कर्मचारी हे दिनांक ०१.०५.२००० नंतर सेवेत आले असल्याने त्यांना महानगरपालिकेच्या सेवेत घेण्यात आलेले नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई महानरगपालिकेतील सुमारे १३८३ सफाई कामगारांच्या मृत्यु झाल्याबाबत**

**(३७) १३६८४ (०७-०४-२०१५). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सतत अस्वच्छतेत काम केल्याने क्षयरोग आणि श्वसनाच्या विविध आजारांमुळे गेल्या ५ वर्षात मुंबई महानगरपालिकेतील सुमारे १३८३ सफाई कामगारांच्या मृत्यु झाल्याची गंभीर बाब माहे जानेवारी, २०१५ च्या दुसऱ्या सप्ताहात वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू मयत सफाई कामगारांच्या कुटूंबियांना भरीव आर्थिक सहाय देण्याबाबत तसेच त्यांच्या वारसांना अनुकंपा तत्वावर पालिका सेवेत सामावून घेण्याबाबत शासनाकडून आजतागायत कोणता धोरणात्मक निर्णय घेण्यात आला आहे वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०८-२०१५) :** (१) हे खरे आहे.
(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत, कामगारांची मोफत वैद्यकीय तपासणी करण्यात येते व विविध आजारापणासाठी लागणारा संपूर्ण वैद्यकीय खर्च महानगरपालिकेमार्फत करण्यात येतो. तसेच कामगाराचे अकस्मात निधन झाल्यास विमा योजनोअंतर्गत रुपये एक लाखाचा विमा त्यांच्या वारसदारास देण्यात येतो. महानगरपालिकेच्या सफाई कर्मचाऱ्यांच्या कुटुंबासाठी दोन दिवसांचे व कर्मचाऱ्यासाठी तीन दिवसांचे (निवासी) प्रशिक्षण आयोजित केले जाते. या प्रशिक्षणात त्यांना कामाच्या ठिकाणी व्यवसमुक्ती, बचतीचे महत्व, सेवानिवृत्तीनंतरचे फायदे, दैनंदिन आरोग्याचे महत्व, महापालिका कल्याणकारी योजना, आपत्कालीन व्यवस्थापन इत्यादीबाबत प्रबोधन केले जाते. तसेच मृत कामगाराच्या कुटुंबियांपैकी एका महानगरपालिकेत नोकरी देण्यात येते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जळगांव महानगरपालिका मालकीच्या व्यापारी संकुलातील मुदत संपलेले गाळे रेडीरेकनर नुसार ४ टक्क्याने प्रिमीयर आकारुन ३० वर्षाच्या करारावर केल्याबाबत**

**(३८) १४०१५ (०७-०४-२०१५). श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगांव महानगरपालिका मालकीच्या व्यापारी संकुलातील कराराची मुदत संपलेले गाळे रेडीरेकनर नुसार ४ टक्क्याने प्रिमीयर आकारून ३० वर्षाच्या करारावर व्यापाऱ्यांनी गाळे द्यावेत अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी मनपा आयुक्त तसेच शासनाला माहे जानेवारी, २०१५ मध्ये केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने तसेच मनपा जळगांव यांनी अद्यापी कोणतीच कार्यवाही केली नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(४) असल्यास, प्रश्न भाग (१) मधील कार्यवाही केव्हा करण्यात येणार आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०८-२०१५) :**(१) अशा प्रकारची निवेदने शासनास व महानगरपालिकेस प्राप्त झालेली नाहीत.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे शहरातील सहकार नगर परिसरात जागेचा ताबा मिळालेला नसतांनाही रुपये ४२ लक्ष खर्च करुन फुलपाखरू उद्यान उभारण्यात आल्याबाबत**

**(३९) १४१९२ (०७-०४-२०१५). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील सहकार नगर परिसरात जागेचा ताबा मिळालेला नसतांनाही रुपये ४२ लक्ष खर्च करुन फुलपाखरू उद्यान उभारण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुळ जागा मालकाने त्यांचा मालकी हिस्सा असलेली जागा महानगरपालिकेकडे परत मागितली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाच्या वतीने चौकशी करण्यात आली काय, त्यानुसार दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०८-२०१५) :**(१) पर्वती स.नं.८२/१ सिटी स.नं. १९९४ येथील सोसायटीच्या मोकळच्या जागेच्या गैरवापर होत असल्याने या सोसायटीच्या लोकांच्या मागणीनुसार या जागेचा ताबा घेवून या ठिकाणी सन २००८-२०११ या कालावधीत फुलपाखरांचे उद्यान विकसित करण्यात आले आहे. यासाठी सुमारे रक्कम रुपये ४२ लक्ष इतका खर्च आला आहे.

(२) मुळ जागा मालकाने त्यांची मालकी हिस्सा असलेली जागा परत मागितलेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई उपनगरातील अंधेरी (पश्चिम) येथील विजय विशाल सोसायटी, न्यु लिंक रोड, ओशिवरा येथे प्लॉट नं. १३७ या जागेवर अनधिकृतपणे अतिक्रमण केल्याबाबत**

**(४०) १४५९२ (०७-०४-२०१५). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील अंधेरी (पश्चिम) येथील विजय विशाल सोसायटी, न्यु लिंक रोड, ओशिवरा येथे प्लॉट नं. १३७ या जागेवर अनधिकृतपणे अतिक्रमण केले असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कार्यकारी अभियंता, म्हाडा यांनी सहा. पालिका आयुक्त. के/पश्चिम विभाग यांना सदर अतिक्रमण निष्कासित करण्याबाबत दिनांक ५ फेब्रुवारी, २०१५ रोजी पत्र दिले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पत्रानुसार अतिक्रमण निष्कासित करण्यात आले आहे वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, सदर अतिक्रमण निष्कासित न करणाऱ्या के/पश्चिम विभागाच्या अधिकाऱ्यांवर शासनातर्फे कोणत्या प्रकारची कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०८-२०१५) :**(१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) सदर पत्रानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या के/पश्चिम विभाग कार्यालयामार्फत दिनांक १२.०२.२०१४ निष्कासनाची कारवाई करण्यात आली आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आणि पुणे महानगरपालकांमध्ये ठेकेदारी पध्दतीने काम करणाऱ्या विविध कामगारांना किमान वेतन देण्याबाबत**

**(४१) १५१५७ (०७-०४-२०१५). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आणि पुणे महानगरपालिकांमध्ये ठेकेदारी पध्दतीने काम करणाऱ्या विविध कामगारांना किमान वेतन दिले जात नसल्याचे माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रकरणी पुणे अप्पर कामगार आयुक्त यांनी पीमपे चिंचवड महानगरपालिका यांना अशा ठेकेदारी स्वरूपावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना किमान वेतनाबरोबर मागील फरकाची रक्कम अदा करण्याचे आदेशही दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अशा निमशासकीय नियोजन प्राधिकरणांकडून ठेकेदारी पध्दतीने भरती केलेल्या कामगारांची पिळवणूक थांबविण्याकरिता शासनाकडून कोणती उपाययोजना करीत आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०८-२०१५) :**(१) पिंपरी चिंचवड महागनरपालिका :- पिंपरी चिंचवड महागनरपालिकेच्या आरोग्य विभागाकडील दैनंदिन स्वच्छता तसेच घरोघरचा कचरा गोळा करण्यासाठी एकत्रित मासिक मानधनावर ठेका दिलेला आहे. (घरोघरचा कचरा गोळा करणे वाहनांवरील कामगारांसाठी रुपये ६०००/-, वाहन चालक/सुपर वायझरसाठी रुपये १००००/-, (कामाची वेळ ७ तास)

पुणे महानगरपालिका :- पुणे महानगरपालिकेकडे तक्रारी प्राप्त झाल्या आहेत,
(२) कामगार आयुक्त, पुणे यांनी दिनांक ५.२.२०१५ च्या पत्रान्वये या कामगारांना किमान वेतन दराने वेतन अदा करणेबाबत तसेच फरकाची रक्कम अदा करणेबाबत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस कळविले आहे.
(३) पिंपरी - चिंचवड महानगरपालिका :- कामगार उप आयुक्त, पुणे यांचे निदेशासनुसार ज्या कंत्राटी कामगारांना किमान वेतन दरापेक्षा कमी दराने वेतन अदा केले आहे त्यांना वेतनातील

फरकाची रक्कम अदा करण्याबाबतची कार्यवाही सुरु असून, कंत्राटी कामगारांची नियुक्त करतांना यापुढे किमान वेतन दरापेक्षा कमी वेतन अदा केले जाणार नाही. तसेच नव्याने ठेके देताना सर्व निविदा किमान वेतन दराने काढण्यात येत आहेत.

पुणे महानगरपालिका :- पुणे महानगरपालिकेतर्फे कंत्राटी कामगारांचे दरमहाचे वेतन धनादेश/बँकेमार्फत अदा करणेबाबत ठेकेदारांवर बंधनकारक करण्यात आले आहे. याशिवाय दिनांक १.४.२०१५ पासून कंत्राटी कामगारांचे वेतन थेट बँकेमध्ये जाम करणेबाबतची कार्यावाही करण्यात येत आहे. याशिवाय विविध औद्योगिक व कामगार अधिनियम व कंत्राटी कामगार अधिनियमातील तरतुदींची परिणामकारक अंमलबजावणी करणेबाबत धोरण ठरविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईमध्ये ३६०० झाडे धोकादायक असल्याबाबत**

**(४२) १५९३७ (०७-०४-२०१५). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेने गेल्या ९ महिन्यात १० लाख वृक्षांची गणना केली त्यापैकी ३६०० झाडे ही धोकादायक असल्याची बाब दिनांक १२ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याची चौकशी वा पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व पर्यावरणाचा समतोल राखण्याच्या दृष्टीने मुंबईतील झाडांची जोपासणा तसेच नवीन वैशिष्ट्यपूर्ण झाडांची लागवड करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्यापी, उपाययोजना केली नसल्यास, होत असलेल्या दिरंगाईची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०८-२०१५)** :(१) व (२) बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून गेल्या ९ महिन्यात व जानेवारी, २०१५ अखरेपर्यंत१२,१२,३४७ इतक्या वृक्षांची गणना पूर्ण झाली त्यापैकी २६२ झाडे धोकादायक असल्याचे निदर्शनास आलेआहे. तथापि धोकादायक झाडांबाबत महानगरपालिकेमार्फत वेळोवेळी पहाणी करुन असंतुलीत व धोकादायक झाडांची शास्त्रोक्त पध्दतीने छाटणी करुन झाडे संतुलीत करण्यात येतात.

(३) पर्यावरणाचा समतोल राखण्याच्या दृष्टीकोनातून बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत दरवर्षी वृक्षांची लागवड करण्यात येते व त्यांची जोपासना केली जाते. तसेच पावसाळ्यामध्ये महानगरपालिकेमार्फत रस्त्यावर, मोकळ्या आवारात, शैक्षणिक संस्था, औद्योगिक संस्था, उद्याने व इतर मोकळ्या जागांवर वृक्षारोपणाचे कार्यक्रम हाती घेतले जातात.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वांद्रे (पूर्व) गांधीनगर स्थित समाजमंदीर सभागृहाचे विकासक व व्यवस्थापन करीत असलेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत**

**(४३) २६११८ (१०-०८-२०१५). श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वांद्रे (पूर्व) गांधीनगर स्थित समाजमंदीर सभागृहाचे विकासक व व्यवस्थापन करीत असलेल्या गैरकामाची चौकशी करुन त्वरीत त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी अशी मागणी दिनांक ६ जानेवारी, २०१४ रोजी स्थानिक लोकप्रतिनिधींनी उपाध्यक्ष, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांचेकडे पत्राद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबची कारणे काय आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. प्रकाश मेहता (२१-०३-२०१६) :** (१) हे खरे आहे.

(२) उपाध्यक्ष, म्हाडा यांचेकडून प्राप्त अहवालानुसार म्हाडाच्या गांधीनगर वसाहतीमधील न.भू.क्र. ६३७ वरील सुमारे ११५० चौ.मी. क्षेत्रफळाचे म्हाडाच्या समाजमंदिराचा भूखंड ईलाईट सहकारी गृहनिर्माण संस्थेस विनियम १६ अंतर्गत वितरीत करण्यात आलेला आहे. पुनर्विकसित इमारत बांधून पूर्ण झाल्यावर सदरहू संस्थेने म्हाडाशी झालेल्या करारनाम्यानुसार तळमजल्यावरील ५१२.१६ चौ.मी. क्षेत्रफळाच्या समाजमंदीर सभागृहाचा मुंबई मंडळास ताबा दिला आहे. तथापि मुंबई महानगर पालिकेच्या मंजूर नकाशात १२.४० एवढी पार्कींगची जागा सदर संस्थेमार्फत म्हाडास वापरण्यास परवानगी दिलेली नाही. त्या अनुषंगाने सदर पार्कींगची जागा म्हाडाला देण्यासंबंधात म्हाडामार्फत ईलाईट सहकारी गृहनिर्माण संस्थेशी सदरहू प्रकरणी दि. ०९.०९.२०१५ च्या पत्रान्वये मुंबई मंडळ, म्हाडा यांनी ७ दिवसांच्या आत सदर पार्कींगची जागा समाजमंदीराकरीता देणेबाबत व तसे न केल्यास संस्थेविरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल असे संस्थेस कळविण्यात आले होते. त्या अनुषंगाने संबंधित संस्थेने म्हाडासोबत केलेल्या करारनाम्यानुसार म्हाडाला हस्तांतरीत करण्यात आलेल्या समाजमंदीराकरीता भुखंडावर पार्कींगचा उल्लेख नसल्याने त्यांच्याकडून कोणत्याही अटी व शर्तीचा भंग झालेला नाही असे कळविले आहे.

या प्रकरणी मुंबई महानगरपालिकेने महानगरपालिकेच्या अभिलेखानुसार पार्कींगच्या जागेसाठी बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या कार्यालयामार्फत सूट देण्यात आलेली नाही, असे कळविले आहे. त्यानुषंगाने अध्यक्ष/ सचिव, इलाईट सह. गृह संस्था यांना समाजमंदिर सभागृहाकरीता असलेली आरक्षित पार्कींगच्या जागेचा वापर मुंबई मंडळास देण्याबाबतची नोटीस दि. ०२.०२.२०१६ रोजीच्या पत्रान्वये बजावण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

**नाशिक जिल्ह्यात गिरणा पाणीपुरवठा योजनेच्या जलवाहिन्या दुरुस्तीबाबत**

**(४४) ३३१२७ (२१-०१-२०१६). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्याला पाणी पुरवठा करणाऱ्या गिरणा पाणीपुरवठा योजनेच्या जलवाहिन्यातून पाणी गळती होत असल्यामुळे पाणी टंचाई निर्माण होत असूनही महापालिकेने याकडे दुर्लक्ष होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास उघडकीस आले आहे हे खरे काय,

(२) असल्यास, सुरु असलेली पाणी गळती त्वरीत थांबविण्याबाबत तसेच होत असलेल्या पाणी गळतीकडे दुर्लक्ष करणाऱ्या महापालिकेच्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप उपाययोजना केली नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०३-२०१६) :**(१) मालेगाव शहरास पाणी पुरवठा करण्यासाठी गिरणा पंपींग स्टेशन ते सायने जलशुध्दीकरण केंद्रापर्यंतच्या अस्तित्वातील पाईप लाईनवर गळती होत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर गळती दुरुस्ती तातडीने महानगरपालिकेमार्फत करण्यात आली आहे.

(२) गिरणा पंपिंग स्टेशन ते सायने जलशुध्दीकरण केंद्रापर्यंत अस्तित्वातील पाईपलाईन वर महानगरपालिकेद्वारे नियमितपणे पेट्रोलिंग करण्यात येत असते.

पेट्रोलिंग करतवेळी आढळलेली गळती तात्काळ बंद करण्यात येते. तथापि रात्रीच्या वेळी काही समाज कंटकाकडून गिरणा पाईप लाईनला छेडछाड करुन,पाईप लाईन लिकेज करण्याचे प्रकार घडतात. त्याकरीता अशा समाजकंटकांवर कार्यवाही करणेबाबत तसेच पाईपलाईनला कोणीही छेडछाड करु नये याकरीता पोलिस विभागाकडे महानगरपालिकेने पत्रव्यवहार करुन त्यांना याबाबत लक्ष घालण्याबाबत विनंती केली आहे.

तसेच, मालेगाव महानगरपालिकेच्या चारही प्रभागामार्फत स्वतंत्र पथकाद्वारे लक्ष ठेवून पाणी गळती आढळल्यास त्वरीत दुरुस्तीची कार्यवाहीकरण्यात येत असते. दुरुस्तीबाबत वेळोवेळी तातडीने कार्यवाही करण्यात आलेली असल्याने, कारवाईबाबत प्रश्न उपस्थित होत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मालेगाव (जि.नाशिक) येथे पिण्याच्या पाण्याची जलवाहिनी दुरुस्त करण्याबाबत**

**(४५) ३३१४३ (२१-१२-२०१४). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगाव (जि.नाशिक) येथे पिण्याच्या पाण्याची जलवाहिनी नादुरुस्त असल्यामुळे हजारो लिटर पाणी वाया जात असल्याने नागरिकांनी जलवाहिनीची त्वरीत दुरुस्ती करण्याची वारंवार मागणी करण्यात येऊनही सदर दुरूस्ती करण्यात आली नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने सदर जलवाहिनी दुरुस्त करण्याबाबत कोणती कार्यवाही केली तसेच जलवाहिनीच्या दुरुस्तीकडे दुर्लक्ष करणाऱ्या दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०३-२०१५)** :(१) मालेगाव शहरास पाणी पुरवठा करण्यासाठी गिरणा पंपींग स्टेशन ते सायने जलशुध्दीकरण केंद्रापर्यंतच्या अस्तित्वातील पाईप लाईनवर गळती होत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर गळती दुरुस्ती तातडीने महानगरपालिकेमार्फत करण्यात आली आहे.
(२) गिरणा पंपिंग स्टेशन ते सायने जलशुध्दीकरण केंद्रापर्यंत अस्तित्वातील पाईपलाईन वर महानगरपालिकेद्वारे नियमितपणे पेट्रोलिंग करण्यात येत असते.

पेट्रोलिंग करतेवेळी आढळलेली गळती तात्काळ बंद करण्यात येते. तथापि रात्रीच्या वेळी काही समाज कंटकाकडून गिरणा पाईप लाईनला छेडछाड करुन,पाईप लाईन लिकेज करण्याचे प्रकार घडतात. त्याकरीता अशा समाजकंटकांवर कार्यवाही करणेबाबत तसेच पाईपलाईनला कोणीही छेडछाड करु नये याकरीता पोलिस विभागाकडे महानगरपालिकेने पत्रव्यवहार करुन त्यांना याबाबत लक्ष घालण्याबाबत विनंती केली आहे.

तसेच, मालेगाव महानगरपालिकेच्या चारही प्रभागामार्फत स्वतंत्र पथकाद्वारे लक्ष ठेवून पाणी गळती आढळल्यास त्वरीत दुरुस्तीची कार्यवाहीकरण्यात येत असते. दुरुस्तीबाबत वेळोवेळी तातडीने कार्यवाही करण्यात आलेली असल्याने, कारवाईबाबत प्रश्न उपस्थित होत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड शहराला पालिकेतर्फे सांगवी येथे आसना नदीवर पाणीपुरवठा योजनेस निधीबाबत**

**(४६) ३३९७३ (२१-०१-२०१६). श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या विष्णूपुरी प्रकल्पाला पर्यायी व्यवस्था म्हणून पालिकेतर्फे सांगवी येथे आसना नदीवर पाणीपुरवठा योजनेचे १५ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला असून आतापर्यंत साडेबारा कोटी रुपये खर्च झाले आहेत. मात्र उर्वरित निधी शासनाकडून मिळाला नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकल्पासाठी उर्वरित निधी शासनाने उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०३-२०१६)** :(१) हे खरे नाही.

(२) नांदेड शहरास पर्यायी पाणी पुरवठा योजनेस पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, महाराष्ट्र शासन यांनी दिनांक २६ ऑगस्ट, २०१४ रोजी मंजुरी दिली असून या योजनेची एकूण किंमत रु. १४८७.११ लक्ष एवढी आहे. पाणी पुरवठा विभागाकडून जिल्हाधिकाऱ्यांमार्फत शासनाचा हिस्सा (९० %) रु. १४३५.७३ लक्ष महानगरपालिकेस प्राप्त झाला आहे. योजनेचे काम पूर्ण झाले आहे. उर्वरित १० % रक्कम महानगरपालिकेने द्यावयाची आहे व त्यामधून कंपाऊंड वॉल व पंप ऑपरेटर रुम, ट्रायल रुम व जलशुध्दीकरण केंद्राची दुरुस्ती ही कामे करण्याचे प्रस्तावित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड शहराचा समावेश स्मार्ट सिटीमध्ये होण्याबाबत**

**(४७) ३३९८९ (२१-०१-२०१६). श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्मार्ट सिटी योजनेत नांदेड शहराचा समावेश झाला नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्मार्ट सिटीमध्ये समाविष्ट होण्यासाठी केंद्र शासनाने काही निकष ठेवले होते जसे स्वच्छ भारत अभियान, नागरिकांसाठी तक्रार निवारण व्यवस्था, ई-न्युज लेटर, मनपा संकेतस्थळ तसेच इतरही कांही निकष बसूनही नांदेड शहराचा स्मार्ट सिटीमध्ये समाविष्ट होवून शकल्याने नागरिकांची गैरसोय होत असल्याने याबाबत शासनाने नांदेड शहराचा स्मार्ट सिटीमध्ये समावेश होण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०३-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) स्मार्ट सिटी अभियानाच्या प्रथम टप्प्यात केंद्र शासनाने विहित केलेले गुणांक निकष व राज्य शासनाने विहित केलेल्या निकषांच्या आधारे सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या १० शहरांची नावे शासनाने शिफारस केली होती. नांदेड शहराचा समावेश सदर १० शहरामध्ये होऊ शकला नाही.

---

**नागपूर शहरात बांधकामासाठी पिण्याच्या पाण्याचा वापर होत असल्याबाबत**

**(४८) ३६२५२ (२१-०१-२०१६). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरामध्ये पाणीटंचाई असल्याने बांधकामावर प्रतिबंध घालण्यासाठी महानगरपालिका प्रशासनाने आदेश दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,नागपूर शहरामध्ये पिण्याच्या पाण्याचे आदेशाचे पद्धतशीरपणे उल्लंघन करुन बांधकामासाठी वापर करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आदेशाचे पालन करण्यास क्षेत्रीय अधिकारी यांच्याकडून कर्तव्यात कसूर केल्याबद्दल त्याच्यांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे, तसेच महानगरपालिका नागपूर प्रशासनाने पाणी पुरवठा टँकर चालकांवर कारवाई केली आहे काय,
(४) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०३-२०१६)** :(१) नागपूर शहरासाठी पुरेसा जलसाठा उपलब्ध असल्याने, पाणीटंचाई नाही तसेच नागपूर महानगरपालिका प्रशासनाने असे कोणतेही आदेश दिलेले नाहीत.
(२) हे खरे नाही.
(३) नागपूर शहरामध्ये उपभोक्ता नळाद्वारे पिण्याचे पाण्याचा बांधकामाकरिता वापर करीता असल्याचे आढळल्यास नागपूर महानगरपालिका पाणी दर मुल्यांकन व वसूली उपविधी, २००९ अंतर्गत व्यापारिक दराने उपभोक्त्याकडून देयक वसूली करण्यात येते.

नागपूर शहरातील टँकरद्वारे पाणीपुरवठ्यावर जी.पी.आर.एस. यंत्रणेद्वारे संगणकीय नियंत्रण ठेवण्यात येते. त्याकरिता प्रत्येक टँकरवर जी.पी. आर.एस. यंत्र बसविलेले आहे. टँकर चालकाविरुध्द तक्रारी प्राप्त झाल्यानंतर जीपीआरएस अहवाल व प्रत्यक्ष मोक्यावरील चौकशीचे आधारे निविदा अटी व शर्तीप्रमाणे टँकर मालकाविरुध्द महापालिकेकडून कार्यवाही करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे, पालघर व रायगड जिल्ह्यातील रस्ते मजबुतीकरण**
**काँक्रिटीकरण व गटार बांधकामाबाबत**

**(४९) ३६९८७ (२१-०१-२०१६). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे, पालघर व रायगड जिल्ह्यातील रस्ते मजबुतीकरण काँक्रिटीकरण व गटार बांधकामासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान एकूण ६० कोटी ६१ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निधीपैकी ठाणे, पालघर व रायगड जिल्ह्यातील कोणकोणत्या कामासाठी सदरहू निधी मंजूर करण्यात आला आहे,
(३) असल्यास, उपरोक्त विकास कामे विहीत कालावधीत पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाकडून कोणती उपाययोजना करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०३-२०१६)** :(१) नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती महानगरपालिका क्षेत्रातील बीओटी तत्वावरील निर्मित खत्री मार्केट संकुलातील गाळे अधिकाऱ्यांनी परस्पर करारनामे करुन गैरव्यवहार केल्याबाबत**

**(५०) ३७१८८ (२१-०१-२०१६). डॉ.सुनिल देशमुख (अमरावती) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती महानगरपालिका क्षेत्रातील BOT तत्वावरील संकुल खत्री कॉम्पलेक्स मार्केट येथील गाळ्यांची मुदत संपत आलेली असताना अधिकाऱ्यांनी परस्पर करारनामे करुन मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार केला असल्याची बाब निदर्शनास आली असून याबाबत आयुक्त, अमरावती महानगरपालिका यांनी चौकशी आदेश दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे व दोषीविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०३-२०१६) :**(१) होय.

(२) प्राथमिक स्वरुपात चौकशी करण्यात आली आहे.

(३) महानगरपालिका प्राधिकरणाचे कोणतेही अधिकार नसतांना करारनामा करण्यात आल्याचे आढळून आले आहे व दोषीविरुध्द एफआयआर दाखल करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रस्तुत प्रकरणी कोणत्याही प्रकारचा विलंब झालेला नाही.

---

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**

**मुंबई.** **प्रधान सचिव,**

**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.